THE PHOENIX
MILLS LIMITED

**Corp. Office:** Shree Laxmi Woolen Mills Estate, 2nd Floor,
R.R. Hosiery, Off Dr. E. Moses Rd. Mahalaxmi, Mumbai - 400 011
Tel: (022) 3001 6600
CIN No : L17100MH1905PLC000200

**October 06, 2026**

**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street, Fort,
Mumbai- 400 001

**Security code: 503100**

**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza,
Bandra-Kurla Complex, Bandra East,
Mumbai- 400051

**Symbol: PHOENIXLTD**

Dear Sir/Madam,

**Sub: <u>Newspaper Advertisement</u>**

Please find enclosed newspaper clippings of advertisement published today viz. Tuesday, October 06, 2026 in the Newspapers viz.- Business Standard (in English) and Navshakti (in Marathi) pursuant to Special Window for transfer and dematerialisation (demat) of physical shares.

The information is also being uploaded on the Company's website at: https://www.thephoenixmills.com/investors/FY2027/Exchange-Intimations.

You are requested to take the aforesaid information on your record.

Yours faithfully,
**For The Phoenix Mills Limited**

BHAVIK MANILAL GALA
Digitally signed by BHAVIK MANILAL GALA
Date: 2026.10.06 16:39:54 +05'30'

**Bhavik Gala**
**Company Secretary**
**Membership No. F8671**

**Encl.:** a/a

# 'ऑक्टोबर हिट'चा सिंधुदुर्गाला तडाखा

## वाढत्या उष्णतेने नागरिक हैराण; तापमान ३४ ते ३६ अंश दरम्यान

**सिंधुदुर्ग:** सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यांमध्ये गेले महिनाभर पाऊस गायब असून 'ऑक्टोबर हिट'चा चटका मात्र तीव्रतेने जाणवू लागला आहे. गेल्या दोन दिवसात तर दोन्ही जिल्ह्यांना उष्णतेचा चांगलाच तडाखा बसला आहे.

ऑक्टोबरमध्ये सिंधुदुर्गात पावसाळी वातावरण असते मात्र आता त्याची जागा कडक उन्हाने घेतली असून गेल्या दोन दिवसात तर अचानक वाढलेल्या तापमानामुळे आणि उष्णतेच्या तडाख्याने लोक पुरते हैराण झाले आहेत.

गेले दोन -तीन दिवस दोन्ही जिल्ह्यातील कमाल तापमान ३४ ते ३६ अंश सेल्सियसच्या आसपास नोंदले गेले आहे हवेतील प्रत्यक्ष जाणवणारी उष्णता आणि उकाडा ४० ते ४३ अंश सेल्सियस एवढा तीव्र अनुभवायला मिळत आहे

सकाळी नऊ वाजल्यापासूनच वातावरणात उष्णता वाढून दुपारच्या सुमारास असह्य उकाडा होत आहे.

हवामान विभागाने नैऋत्य मोसमी पावसाचा हंगाम संपल्याची घोषणा नुकतीच केली आहे. पुढील काही दिवसात तर परतीचा पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.मात्र परतीचा पाऊस अजूनही दृष्टीपथात नाही.

ऑक्टोबर महिना सुरू होण्यापूर्वीच कोकणात सिंधुदुर्ग-रत्नागिरी जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढण्यास सुरुवात झाली. हवामान खात्याने तर पुढील तीन दिवस मुंबई सह संपूर्ण कोकण प्रदेशात उष्ण व दमट वातावरणाचा 'येलो अलर्ट' चा इशारा दिला आहे. पुढील काही दिवसात कमाल तापमान ३४ ते ३६ अंशाच्या आसपास राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे परिणामी उष्णतेचा हा धडाका पुढील काही दिवस असाच कायम राहण्याची चिन्हे आहेत.

उष्णतेच्या या तडाख्यामुळे सिंधुदुर्गातील कणकवली, कुडाळ, सावंतवाडी या शहरांमध्ये उष्णतेची झळ अतिशय तीव्रतेने जाणवत आहे. कणकवली तालुक्यात सर्वाधिक ३६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून हा भाग सर्वात उष्ण ठरला आहे. मालवण,देवगड, वेंगुर्ले सारख्या सागरीपट्ट्यातही समुद्रावरून येणाऱ्या दमट वाऱ्यामुळे उष्णतेची तीव्रता कमालीची वाढली आहे.

दरम्यान उष्णतेच्या पार्श्वभूमीवर लोकांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. १२ ते ४ या वेळेत कामाशिवाय फिरू नये.



### अशी घ्या काळजी

या कालावधीत बाहेर पडणे अत्यंत गरजेचे असेल तरच डोक्यावर टोपी छत्री किंवा रुमाल अशा साधनांचा वापर करावा. शरीराचे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्याने 'डिहायड्रेशन'चा धोका निर्माण होतो हे लक्षात घेऊन पुरेसे पाणी प्यावे. सोबत पाण्याची बाटली ठेवावी तसेच उष्णतेचा सामना करण्यासाठी लिंबू सरबत, ताक शाळेचे पाणी,या द्रव्य पदार्थांचे सेवन करावे असे आवाहनही आरोग्य विभागाने केले आहे.

## महापौरांचे दावे धादांत खोटे

**वसई :** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा-आचोळे येथील नाट्यगृह व विरार-बोळींज येथील क्रीडा संकुलाच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने उडालेला गोंधळ आणि नियमबाह्य निमंत्रण पत्रिकेबाबत काल, ४ ऑक्टोबर रोजी महापौरांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेतील सर्व खुलाशांचे विरोधी पक्षनेते मनोज पाटील यांनी आज खंडन केले.

महापौर व त्यांच्या विधानांचा खरपूस समाचार घेतला. बविआ आपल्या चुका मान्य करण्याऐवजी त्याचे समर्थन करत असून, प्रोटोकॉल आणि शासकीय नियमांची पायमल्ली करत असल्याचा आरोप मनोज पाटील यांनी केला. या प्रसंगी त्यांच्यासोबत भाजप जिल्हा प्रमुख प्रज्ञा पाटील आणि गटनेते अशोक शेळके प्रमुख उपस्थित होते.

मनोज पाटील यांनी महापौरांच्या भूमिकेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. "शासकीय निर्णय म्हणजे कायदा नाही, असे वक्तव्य करून घटनात्मक पदावर बसलेल्या महापौरांनी अराजकता माजवणारी भूमिका घेतली आहे, याचा आम्ही तीव्र निषेध करतो," असे पाटील म्हणाले.

# मच्छिमार, कष्टकऱ्यांसाठी मुंबई बँक योजना आणणार

## मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांचे प्रतिपादन



**मुंबई :** मच्छिमार बांधव हे मुळ मुंबईकर आहेत. मच्छिमार व कष्टकऱ्यांसाठी आगामी काळात मुंबई बँक योजना आणणार असे, प्रतिपादन मुंबई बँकेचे अध्यक्ष व भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी अणूशक्ती नगर येथील मुंबई बँकेच्या नवीन शाखेच्या उदघाटन प्रसंगी केले.

यावेळी चेंबूरचे आमदार तुकाराम काते यांच्या शुभहस्ते अणूशक्ती नगर येथील नवीन शाखेचे उदघाटन पार पडले.

याप्रसंगी मुंबई बँकेचे अध्यक्ष व भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, सहकारातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे, मुंबई बँकेचे संचालक नंदकुमार काटकर, संदीप घनदाट, विठ्ठल भोसले, जिजाबा पवार, अनिल गजरे, विष्णू घुमरे, कविता देशमुख, तेजस्वी घोसाळकर, बँकेचे कार्यकारी संचालक संदीप सुर्वे, विविध संस्थांचे पदाधिकारी, बीएआरसीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरेकर म्हणाले कि, ट्रॉम्बे परिसरात कष्टकरी सर्वसामान्य वर्ग, निवृत्त लोकं, मच्छिमार राहतात. सर्वसामान्य घटकाला जी मदत करण्याची आवश्यकता आहे ती या शाखेच्या माध्यमातून चांगल्या पद्धतीने होणार आहे. या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना अडचणीच्या वेळी सहज व सुलभ व्यवस्था जर केली तर राष्ट्रीय, खासगी बँकांपेक्षा जास्त प्रतिसाद मुंबई जिल्हा बँकेला मिळेल.

मुंबई बँकेने लाडक्या बहिणींना उद्योगासाठी एक लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज दिले असून दोन ते अडीच हजार महिलांनी याचा लाभ घेतला आहे. ही मुंबई बँकेची देण आहे. हा विचार दुसरी बँक करणार नाही. त्यांना तुमच्या उत्कर्षाशी देणघेणं नसते. त्यांना फक्त व्यवसाय करायचा असतो आणि ठेवी वाढवायच्या असतात. आम्ही सभासद, ग्राहकांच्या विश्वासाच्या ठेवी जमवायचा प्रयत्न करतो, असेही आ. दरेकर म्हणाले.

### २५ हजार कोटींचा टप्पा ओलांडणार

आ.दरेकर म्हणाले कि, अनेक आरोप, टीका झाल्या. संकटे आली. तरी विचलित न होता बँक मोठी झाली पाहिजे, तीचा उपयोग सर्वसामान्य जनतेला झाला पाहिजे, असा ध्यास घेऊन काम केले म्हणून आज बँकेची उलाढाल १५-१६ हजार कोटींवर गेली आहे. येत्या काळात आम्ही २५ हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडणार आहोत.

# वैज्ञानिक संशोधनात मराठी कन्येची भरारी

**मुंबई :** वैज्ञानिक संशोधनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भारतीय वंशाच्या डॉ. श्रीया शेट्ये यांची युरोपियन रिसर्च कौन्सिलच्या प्रारंभिक संशोधन कार्यासाठी देण्यात येणाऱ्या या प्रतिष्ठित अनुदानासाठी निवड झाली आहे.

त्यांच्या MERLIN (Magnetism, Evolution, and Rotation in Late-stage stellar Nucleosynthesis) या महत्त्वाकांक्षी संशोधन प्रकल्पासाठी हे अनुदान मंजूर झाले आहे. या यशामुळे डॉ. श्रीया शेट्ये यांनी भारतीय आणि मराठी समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. डॉ. श्रीया शेट्ये या सध्या बेल्जियममधील विविध खगोलशास्त्र संशोधनाशी संबंधित आहेत.



### शेट्ये कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण

डॉ. श्रीया शेट्ये या बालपणापासूनच सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आल्या आहेत. शेट्ये कुटुंबाला समाजसेवेची आणि सामाजिक बांधिलकीची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे.

# आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

**डोंबिवली :** राष्ट्रीय शिक्षण संस्था, डोंबिवली आयोजित रौप्यमहोत्सवी आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

या स्पर्धेत विविध शाळांतील ४७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विविध गटांतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे प्रख्यात वास्तुशास्त्रज्ञ अलंकार ताईशेटे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व चषक प्रदान करून गौरविण्यात आले.



स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, रामचंद्रनगर, डोंबिवली (पूर्व) येथे या स्पर्धेचे आयोजन केले होते. संस्थेचे अध्यक्ष संजय कुलकर्णी आणि कार्यवाह शिरीष फडके यांच्यासह, उपाध्यक्ष कुलकर्णी, सहकार्यवाह उंटवाले, नंदू जोशी, माधुरी जोशी, संजय दीक्षित, उपस्थित होते. त्याचप्रमाणे स्पर्धा प्रमुख मीरा कुलकर्णी व गवळी, शाळास्तर प्रमुख उर्मिला चव्हाण सर्व शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांबळी यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात चित्रकलेचे महत्त्व विशद केले.


**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८**

श्री सिध्दिविनायक

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel. : 022- 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org mahaprasad@siddhivinayak.org

**Nit Document**

**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.**

**महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणारा काजू तुकडा खरेदीसाठी ई-निविदा मागविण्याबाबत.**

**काजू तुकड्याचा पुरवठा कालावधी सन २०२६ ते २०२७ (एका वर्षाकरीता)**

**ई-निविदा सूचना :**

मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या काजू तुकड्याच्या खरेदीसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-पुर्ननिविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | :- मंगळवार दि. ०६ ऑक्टोबर, २०२६ |
| ई-निविदापुर्व बैठक वार व दिनांक (काजू तुकडा) | :- मंगळवार दि. १३ ऑक्टोबर, २०२६ दु. ३ वा. |
| कच्चा माल नमुना तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | :- गुरुवार दि. १५ ऑक्टोबर, २०२६ सायं. ६ वा. |
| ई-निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | :- सोमवार दि. १९ ऑक्टोबर, २०२६ सायं. ४.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ (काजू तुकडा) | :- गुरुवार दि. २२ ऑक्टोबर, २०२६ दुपारी २.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ (काजू तुकडा) | :- गुरुवार दि. २२ ऑक्टोबर, २०२६ दुपारी ३.०० वा. |
| स्थळ | :- श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, तिसरा मजला, न्यास कार्यालय |

सही/-
(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी

डीजीआयपीआर-२०२६-२७/३०७९



**जाहीर सूचना**

सूचना घ्यावी की, मला माझ्या अशिलांनी येथील खालील लिहिलेल्या परिशिष्टात वर्णिलेल्या त्यांच्या मिळकतीच्या संदर्भातील प्लॉट क्र. ५१७, सी.टी.एस. क्र. १सी/१/५२७, गाव कांदिवली, रोड क्र. आरएससी ४९, पार्ट-III, सेक्टर क्र. ५, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे स्थित नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यूआर/एचएसजी/टीओ/३९५१/ १९८८-८९ दिनांक ११/०१/१९८९ अंतर्गत महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९६० अंतर्गत नोंदणीकृत सोसायटी, **चारकोप (१) गिरिराज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.** च्या नामाधिकाराचा तपास करण्यास सांगितले आहे.

कोणीही व्यक्ती किंवा व्यक्तीं ज्यांचा विक्री, प्रभार, अदलाबदल, बक्षीस, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, कुळवहिवाट, विकास करार, संयुक्त उपक्रम, वारसाहक्क किंवा अन्यथा कोणत्याही मार्गाने सदर मिळकतीमध्ये कोणताही दावा किंवा कोणताही हितसंबंध असल्यास सदर प्रसिध्दी तारखेपासून १४ (चौदा) दिवसात संबंधित कागदपत्रांसह निम्नस्वाक्षरीकारांना लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास गृहित धरण्यात येईल की, सदर सोसायटी ही येथील खालील लिहिलेल्या परिशिष्टात वर्णिलेल्या मिळकतीसाठी सर्वस्वी हक्कदार आहे आणि की सदर मिळकत सर्व भारांपासून मुक्त आहे आणि त्या संदर्भातील नामाधिकाराचा तपास आणि व्यवहाराचे प्रकरण काही असल्यास अशा दाव्याच्या संदर्भाशिवाय पूर्ण करण्यात येईल आणि ते त्यागित केल्याचे समजण्यात येईल आणि सदर मिळकतीशी संबंधित कोणतीही कागदपत्रे कब्जात असलेली कोणतीही व्यक्ती/व्यक्ती ती कोणत्याही अधिकाराविना व बेकायदेशीररीत्या धारण करीत आहे असा निष्कर्ष काढला जाईल आणि त्यानुसार परिशिष्ट मिळकतीसाठी सोसायटीचे नामाधिकार प्रमाणित करण्यात येतील.

**परिशिष्ट मिळकत**

मुंबई शहरचा जिल्हा आणि मुंबई उपनगरच्या उपजिल्ह्याती त्यावरील उभ्या चारकोप (१) गिरिराज सीएचएसएल मधील ४५ क्लस्टर युनिट्ससह एकत्रित मोजमापित २०३४.४८ चौ.मी. प्लॉट क्र. ५१७, सी.टी.एस. क्र. १सी/१/५२७, गाव कांदिवली, रोड क्र. आरएससी ४९, पार्ट-III, सेक्टर क्र. ५, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे असलेल्या जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग.

**दिनांक: ०६.१०.२०२६**

सही/-
**सौ. श्वेता संघवी**
**(प्रस्तावित विकासकाकरिता वकील)**
बी-१०२, रीमा रेसिडेन्सी, शिंपोली रोड, चिकूवाडी, बोरिवली-प., मुंबई-४०००९२, **ई-मेल:-** swetajain06@gmail.com



**जाहीर सूचना**

**सूचित करण्यात येते की, (१) श्री. विशाल सुरेश मखिजा आणि (२) श्रीमती कोमल विशाल मखिजा ("मालक")** हे खाली नमूद केलेल्या व्यावसायिक जागेचे मालक आहेत आणि/किंवा त्यांच्या कब्जात असून आणि/किंवा अन्यथा सदर व्यावसायिक जागेवर त्यांचा योग्य व पुरेसा हक्क आहे. मालकांनी खाली नमूद केलेली व्यावसायिक जागा आणि त्यासंबंधीचे सर्व हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, लाभ, शेअर्स इत्यादी माझ्या अशीलास/अशिलांना विक्री, हस्तांतरण आणि असाइन करण्याचे मान्य केले आहे.

खाली नमूद केलेल्या व्यावसायिक जागेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, अदलाबदल, गहाण, भेट, धारणाधिकार, ट्रस्ट, कब्जा, वारसा, सुखाधिकार, लायसन्स किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा/हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने/संस्थेने, अशा दाव्याची/हरकतीची माहिती सहाय्यक दस्तऐवजांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खाली सही करणाऱ्यास या सूचनेच्या प्रसिद्धीपासून **१५ दिवसांच्या आत** लेखी स्वरूपात कळवावी; अन्यथा असा दावा, असल्यास, त्याग केलेला मानला जाईल आणि खाली नमूद केलेल्या व्यावसायिक जागेसंबंधी मालक आणि माझे अशील/अशील यांच्यातील व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

**मिळकतीचे परिशिष्ट:**

युनिट क्र. ४०२ धारण करणारी, ५७१ चौ. फूट चटई क्षेत्र मोजमापाची व्यावसायिक जागा, ४थ्या मजल्यावर, १ (एक) कार पार्किंग स्लॉटसह, ८१ क्रेस्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या विंग बी मध्ये, गाव - जी वॉर्ड, तालुका - वांद्रे येथील सीटीएस क्र. जी/३१७ आणि जी/३१८-बी धारण करणाऱ्या जमिनीच्या प्लॉटवर उभी, स्थित व असलेली, लिंकिंग रोड, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई - ४०००५४ येथील सदर व्यावसायिक जागा.

**दिनांक: ६ ऑक्टोबर, २०२६**
**केजे लीगल अँड असोसिएट्स यांच्यासाठी**
**केजे लीगल अँड असोसिएट्स यांच्यासाठी**
**सही/- (कुणाल एस. जैन)**
**प्रोप्रायटर**
**युनिट क्र. २ आणि ३, पहिला मजला, द सोलारिस-सोसर, २रा आणि ३रा रोड जंक्शन, रेल्वे स्टेशनजवळ, खार (पश्चिम), मुंबई-४०००५२. ईमेल: - info@kjlegal.in**
**मो.: +९१-९८९२९९०२९४**



**सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India**
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911
गणेश भवन, पै नगर, गंजावाला लेन, बोरिवली पश्चिम, मुंबई- ४०००९२

**शुद्धिपत्र**

कृपया ०२/१०/२०२६ रोजी या वृत्तपत्रात **३एस एन्वो सोल्युशनसाठी** प्रकाशित झालेल्या डीआरटी सूचनेचा संदर्भ घ्यावा.
अनवधानाने चुकीचे नाव नमूद करण्यात आले आहे, म्हणजे
**३८ एन्वो सोल्युशन**
**आणि**
**३५ एन्वो सोल्युशन.**
योग्य नाव आहे
**३एस एन्वो सोल्युशन**



**जाहीर नोटीस**

ह्या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे पेल्हार, ता. वसई, जि. पालघर येथील बिनशेती मिळकत सर्व्हे नं. २५३, हिस्सा नं. बी/१, क्षेत्र ८६५७-४४ (चौ. मी), आकार २५९७-२३ (रु. पैसे) तसेच व्ही व्ही सी. एम. सी. बी २०२६/ओपीएल/०१५४५ दि. ३१/०३/२०२६ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या बांधकाम परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्रानुसार मंजुर औदयोगिक इमारत क्र. १ व इमारत क्र. २ यांच्याशी संबंधीत कायदयानुसार अनुज्ञेय असलेला एफ. एस. आय (यापुढे संक्षिप्ततेसाठी "सदर मिळकत" असे संबोधण्यात आलेले आहे) सदर मिळकत मेसर्स डेलाइट इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलास कायमस्वरुपी विकत देण्याचे ठरविले आहे. तरीही सदर मिळकतीबाबत कोणत्याही स्वरुपाची हरकत, अधिकार, वहिवाट, शेअर, विक्री, गहाण, लिज, परवाना, बक्षिस, कब्जा, बोजा असल्यास तसे लेखी योग्य त्या पुराव्यासकट खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आजपासून ७ दिवसाचे आत कळवावे. अन्यथा आपला काहीही हक्क नाही व तो असल्यास आपण सोडला आहे असे समजून व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अशीलाकरीता,
**ॲड. एम्. एस्. रॉड्रीग्ज**
५/११७, दिवाण टॉवर, वसई रोड (प), ता. वसई,



**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सूचना क्र. नमुंमपा/श.अ./ 161 /2026-27**

**कामाचे नाव :-** नेरुळ सेक्टर-2 भुखंड क्र.15 ते 19 येथे रस्ता व गटर बांधणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) :-** 1,12,42,718/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.06/10/2026 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
**शिरीष गं. आरदवाड**
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/834/2026



**SBI State Bank of India**
**घाटकोपर पूर्व शाखा**
१ रत्नदीप, भावेश्वर लेन, घाटकोपर पूर्व मुंबई ४०००७७

**सोन्याच्या दागिन्यांच्या लिलावासाठी जाहीर सूचना**

खाली नमूद केलेले कर्जदार अनेक स्मरणपत्रे देऊनही कर्जाची परतफेड करण्यात आणि विहित वेळेत सोन्याचे दागिने सोडविण्यात अयशस्वी झाले आहेत. खाली दिलेल्या कर्जदाराने दिलेल्या कर्ज खात्यांतर्गत तारण ठेवलेले सोन्याचे दागिने/अलंकार **०९.१०.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता** शाखेच्या आवारात जाहीर/खाजगी लिलावात विकले जातील.

| खाते क्र. | कर्जदाराचे नाव | पत्ता | रक्कम/ एकूण वजन |
|---|---|---|---|
| ४३०७९२ ४४६६३ | श्री. दिनकर शिवकुमार तिवारी, शिवकुमार तिवारी यांचा मुलगा | बी/८३, रोड ३, टिळक नगर, चेंबूर, पेंस्टोम सागरजवळ, मुंबई-४०० ०७१. | **१३८ ग्राम्स** बी/८३, रोड ३, टिळक नगर, चेंबूर, पेंस्टोम सागरजवळ, मुंबई-४०० ०७१. |

**नियम आणि अटी**

१. कोणतेही कारण न देता कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार बँकेकडे आहे.
२. यशस्वी बोलीदार घोषित करण्यापूर्वी कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी लिलाव निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे बँकेला स्वातंत्र्य राहील.
३. कृपया लक्षात घ्या की लिलाव त्याच दिवशी पूर्ण न झाल्यास, त्याच अटी व शर्तींवर पुढील दिवशी केला जाईल.

**सही/- प्राधिकृत अधिकारी**



**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागवण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ चे टी - १६, टी -१७ व टि - १८ अनुक्रमे मुरुड, पाली व रोहा उपविभागातील २० KW पर्यंत लघुदाब घरघुती, वाणिज्य व इतर मीटर रीडिंग वाचन महावितरण मोबाईल ऐपद्वारे, बिल प्रिंटींग व वाटप करण्याच्या कामाकरीता. निविदा विक्री कालावधी दि ०६.१०.२०२६ ते १५.१०.२०२६ निविदा भरण्याची शेवटची तारीख दि. १५.१०.२०२६ रोजी २३:०० वाजेपर्यंत. वरील निविदा भरण्याकरिता कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**PRO NO - 101** **कार्यकारी अभियंता, रोहा विभाग**



**यूको बैंक** (भारत सरकार का उपक्रम) **UCO BANK (A Govt. of India Undertaking)**
सम्मान आपके विश्वास का Honours Your Trust

**बदलापूर पूर्व शाखा,** मंगलमूर्ती बंगलो विवकानंद नगर, बदलापूर - ४२१५०३,
**ईमेल:** badlap@ucobank.in, **दूर. क्र.** ०२५१-२६९५४८०

**कब्जा सूचना** (जोडपत्र IV) (नियम-८(१) पहा) (स्थावर मिळकतीकरिता)

**ज्याअर्थी,** निम्नस्वाक्षरीकारांनी **युको बँक**चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट), २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **०५-०६-२०२६ रोजी मागणी सूचना** जारी करून कर्जदार/गहाणदार **श्रीमती लक्ष्मी अंजिलाया बेंदूर (कायदेशीर वारस/मयत श्री. बेंदूर अंजिलालाह यांच्या पत्नी) आणि श्री. बेंदूर अंजिलालाह (मयत)** ह्यांना सूचनेत दिलेल्या रक्कम ०१-०६-२०२६ रोजीसप्रमाणे **रु. २४,०६,०३५.०१/- (रुपये चोवीस लाख सहा हजार पस्तीस आणि एक पैसा मात्र)** वरील सदर रकमेवर सांपार्श्विक दराने **(३०-०५-२०२६ पर्यंतचे व्याजाचे एकत्रित)** एकत्रित सह आनुषांगिक खर्च, परिव्यय, प्रभार इ. या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यात यावरील नमूद कर्जदार/गहाणदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार/गहाणदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **सांकेतिक कब्जा** सदर ॲक्टच्या कलम १३ चे उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्याला/तिला प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **०५ ऑक्टोबर २०२६** रोजी घेतला.

विशेषत: कर्जदार/गहाणदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी व्यवहार करू नये व मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **युको बँक, बदलापूर शाखे**च्या दिनांक ३०-०५-२०२६ पर्यंतच्या व्याजासह रक्कम **रु. २४,०६,०३५.०१/- (रुपये चोवीस लाख सहा हजार पस्तीस आणि एक पैसा मात्र)** अधिक त्यावरील पुढील व्याज आणि अन्य परिव्यय बँकेच्या भाराच्या अधीन राहील.

तारण मत्तेच्या विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदी अन्वये कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

गाव पिसवली, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, नोंदणी जिल्हा व उप-नोंदणी जिल्हा कल्याण-ठाणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत, कल्याण-४२१३०६ येथे स्थित, धारक सर्व्हे क्र. २८, हिस्सा क्र. १/२ (भाग), जुना सर्व्हे क्र. २८, हिस्सा क्र. १ए आणि सर्व्हे क्र. ३५, हिस्सा क्र. ०६ असलेल्या जमिनीवर बांधकामीत "श्री आनंदी हेरिटेज" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्ञात कॉम्प्लेक्समधील बी-विंगच्या ११व्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्र. ११०४, ज्याचे चटई क्षेत्रफळ मोजमापीत अंदाजे २२.५४ चौ. मीटर अधिक खुली टेरेस ४.९३ चौ. मीटर, तसेच १.५७ चौ. मीटर फ्लॉवरबेड क्षेत्र आणि २.३६ चौ. मीटर बाल्कनी क्षेत्र वापरण्याच्या हक्कासह, सदर धारक जमीन.

**दिनांक : ०५-१०-२०२६**
**ठिकाण: ठाणे**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**युको बँक**



**ION EXCHANGE** Refreshing the Planet

**आयन एक्स्चेंज (इंडिया) लिमिटेड**
**सीआयएन: एल७४९९९एमएच१९६४पीएलसी०१४२५८**
**नोंदणीकृत कार्यालय:** आयन हाऊस, डॉ. ई. मोझेस रोड, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०११
**दू.** + ९१ २२ ६२३१२०४२ **फॅक्स:** +९१ २२ २४९३८७३७ | **वेबसाईट:** www.ionexchangeglobal.com

**प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा सादर करण्यासाठी विशेष कक्ष पुन्हा सुरु**

याद्वारे सूचना देण्यांत येते की, सिक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६, दिनांक ३० जानेवारी, २०२६ ला अनुसरून ०५ फेब्रुवारी, २०२६ पासून ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत १ एप्रिल, २०१९ पूर्वी सादर केलेले आणि कंपनीकडे प्रलंबित हस्तांतरणे/दस्तावेजातील त्रुटींमुळे किंवा अन्य कारणांनी परत केलेले/फेटाळलेले/विचारात न घेतलेले प्रत्यक्ष शेअर्सचे हस्तांतरण विलेख पुन्हा सादर करण्यासाठी एक विशेष कक्ष सुरू केला आहे.

ह्या कालावधीत, हस्तांतरणासाठी पुन्हा सादर केलेले रोखे हस्तांतरण-नि-डिमॅट विनंत्यांसाठीची योग्य प्रक्रिया आणि वैध हस्तांतरणासाठी विहित आवश्यकतांचे पालन करण्याच्या आधीन फक्त डिमॅट स्वरूपात जारी केले जातील. सदर तारखेनंतर कोणतेही पुर्नसादरीकरण स्वीकारले जाणार नाही.

पुढील तपशिलांसाठी, कृपया कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट म्हणजेच एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला csg-unit@in.mpms.mufg.com येथे, प्रक्रिया आणि दस्तावेजांवरील चौकशीसाठी https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html येथे लिहावे किंवा हेल्पलाईन क्र. + ९१ २२-४९१८६००० वर कॉल करावा.

**केवायसी अद्यतन आणि डिमॅट स्वरुपात प्रत्यक्ष शेअर्सचे रुपांतर**

प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांनी, दावारहित लाभांशांचे इलेक्ट्रॉनिक क्रेडिट सुलभ करण्यासाठी त्यांच्या केवायसी औपचारिकता पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात येत आहे आणि धारणा आणि व्यवहार सुलभ करण्यासाठी त्यांच्या शेअर प्रमाणपत्रांचे डिमटेरियलायझेशन करण्यास प्रोत्साहित करण्यात येते. त्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे की, सलग सात वर्षे दावारहित कोणताही लाभांश, संबंधित शेअर्ससह इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ॲथॉरिटी (आयईपीएफए) कडे हस्तांतरित केला जाईल आणि त्यामुळे विहित कालमर्यादेत अशा लाभांशाच्या दावा करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

**आयन एक्सचेंज (इंडिया) लिमिटेड करिता**
**सही/-**
**निकिशा सोलंकी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**एसीएस-५०८९४**

**दिनांक : ५ ऑक्टोबर, २०२६**
**ठिकाण : मुंबई**



**PUBLIC NOTICE**

**NOTICE** is hereby given to the **Public** that my Clients have agreed with **Mrs. Rinku Sanjay Jain** for Purchase of her commercial **Property** more particularly described in the **Schedule** hereunder written, free from inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession, adverse possession claim, encumbrance or otherwise howsoever and whatsoever nature of any one over the same.

**All Persons** having any claim or right in respect of the **Property or any part thereof** hereunder mentioned whether by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession, adverse possession claim, encumbrance or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing with all supporting documents to the undersigned between 11.00 a.m and 6.00 p.m on any working day except Sundays and Bank Holidays at the address of the Advocate given below within **14 (Fourteen) days** from the date of publication of ther Notice, failing which the claim of such person or persons, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned and my clients shall be at liberty to complete the transaction without reference to any such claim, right, interest, charge, encumbrance or any other right or entitlement of whatever nature of any one.

**DESCRIPTION OF THE PROPERTY [PREMISES]**

**ALL THAT Office No. 207** [Unit No. 7] admeasuring **307 Square feet Carpet area** on the **Second Floor** in the building known as **"AURUM"** also known as **"AURUM MALL"** of the **Aurum Premises Co-operative Society Limited** situated at **18/22, Sheikh Memon Street, Near Cotton Exchange Building, Zaveri Bazar, Kalbadevi Road, Mumbai – 400 002** constructed on Land bearing **C.T.S. No. 1571 of Bhuleshwar Division** in the Registration District of Mumbai City and Municipal Ward 'C' alongwith **Twenty (20) fully paid-up shares** of Rupees Fifty (50/-) each bearing **Distinctive Nos. 601 to 620** (both inclusive) vide **Share Certificate No. 31** dated **14/08/2018** issued by the above said Society.

**Mumbai**
**Date: 6th October, 2026**

**Sd/-**
**D.S. Sukhija**
**Advocate**
**Room No.7, 1st Floor, Kalyan Apartments, Plot No. 286, Opp. Kings Circle Rly. Stn.. Sion Road (East), Mumbai – 400 022**



**दी फिनिक्स मिल्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय -** ४६२, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई -४०० ०१३.
**सीआयएन :** L17100MH1905PLC000200 **दूर. :** + ९१ २२ ३००१ ६६००
**ई-मेल :** investorrelations@phoenixmills.com **वेबसाइट :** www.thephoenixmills.com

**भागधारकांना कागदोपत्री शेअर्सच्या हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करण्यासाठीची स्पेशल विन्डो**

सेबी परिपत्रक क्र. **एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५० /२०२६,** दि. ३०.०१.२०२६ अन्वये वरील निर्देशित विषयासंदर्भात कृपया नोंद घ्यावी की, दि. ०१.०४.२०१९ रोजी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या कागदोपत्री स्वरूपातील शेअर्सचे हस्तांतरण व डीमॅटकरिताची स्पेशल विन्डो दि. ०४.०२.२०२७ पर्यंत खुली राहील.

ज्या भागधारकांना दि. ०१.०४.२०१९ पूर्वी शेअर्स खरेदी केले होते आणि हस्तांतरणाकरिता शेअर्स दाखल केले नव्हते किंवा दस्तावेजांतील कमतरता/प्रक्रिया/वा अन्य काही कारणास्तव स्तांतरणाची विनंती रद्द झाली होती/परत आली होती/दुर्लक्षित राहिली होते ते दि. ०५.०२.२०२६ ते दि. ०४.०२.२०२७ दरम्यानच्या १२ महिन्यांच्या कालावधीकरिता हस्तांतरणाकरिता शेअर्स दाखल करू शकतील/पुन्हा दाखल करू शकतील.

तुम्हाला सदर संधी प्राप्त करावयाची असल्यास कृपया कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट अर्थात एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना त्यांचे कार्यालय पत्ता सी १०१, एम्बॅसी २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३ येथे संपर्क साधावा.

शेअर्सची हस्तांतरण विनंती मान्य झाल्यास, ते केवळ डीमॅट स्वरूपात वितरीत करण्यात येतील. असे हस्तांतरण तथा डीमॅट विनंतीकरिता योग्य ती प्रक्रिया पालन करण्यात येईल.

पुढील माहितीकरिता कृपया सेबी परिपत्रकांतील लिंक पाहावी किंवा investorrelations@phoenixmills.com येथे ई-मेल लिहावा.

**दी फिनिक्स मिल्स लिमिटेडकरिता**
**सही/-**
**भाविक गाला**
**कंपनी सचिव**
**सभासदत्व क्र. एफ८६७१**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०५.१०.२०२६**